MHRG040059322025

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १८३६/२०२५**
**विशाल रमेश म्हात्रे व इतर**
**विरूध्द**
**कोणीही नाही**

**पाचवे सह. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः आर.वाय.खंडारे यांचे समक्ष)

**निशाणी ०१ खालील आदेश**

**०१.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज १८२७ च्या बॉम्बे रेग्युलेशन क्र. VIII अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र. १ ते ३ हे **मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे** यांची मुले आहेत. मयत सिमा रमेश म्हात्रे हया दिनांक १७/०३/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. मयत रमेश शंकर म्हात्रे हे दि. २७/०९/२०२३ रोजी मयत झाले आहेत. मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही. मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे यांच्या नावावर अर्जाच्या परिच्छेद क्र. ६ मध्ये नमुद असलेली मालमत्ता आहे व मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे यांच्या मृत्यूनंतर सदर मालमत्तेतील त्यांच्या हिश्श्याला अर्जदार क्र. १ ते ३ यांचे नाव वारस म्हणुन लावण्यासाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदारांनी **नि.क्र. ११** प्रमाणे दि. १६/०१/२०२६ रोजी जाहिरनामा व दि. १६/०१/२०२६ रोजी 'किल्ले रायगड' या पेपरमध्ये जाहिर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

**०४.** वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदार यांनी त्यांचे तर्फे अर्जदार क्र.०१ विशाल रमेश म्हात्रे यांचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.१३** वर दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या आई व वडिलांच्या मृत्यूचे मुळ दाखले **नि.१५ व १६** वर दाखल केली आहेत. त्यांच्या आई व वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत

करारनामा क्र.२००३/२०१८ ची पडताळलेली प्रत **नि.१७** वर दाखल केली आहे. त्याच मालमत्तेच्या शेअर सर्टीफिकेट व ताबा पावतीच्या पडताळलेल्या प्रती **नि.२०** वरील यादीसोबत दाखल केली आहे. त्यांच्या आई व वडिलांच्या नावावर असलेल्या कोपरोली येथील मालमत्तेच्या कर आकारणी नोंद वहीची प्रमाणित प्रत **नि.१८** वर दाखल केले आहे. तसेच अर्जदारांच्या आधार कार्डची सत्यप्रती दाखल केली आहेत. **आर्टिकल 'अ'** वर वृत्तपत्रात जाहिर करण्यात आलेली नोटीस दाखल करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त **नि.११** वर जाहिरनाम्याची बजावणी करण्यात आलेली आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी **नि.क्र. १९** वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे.

**०५.** अर्जदार क्र. १ ते ३ यांनी साक्षीमध्ये सांगितलेल्या कथनास कागदपत्र दुजोरा देतात. **नि.क्र. १७, १८** वरील व यादी **नि.क्र.२०** सोबत दाखल कागदपत्रानुसार सदर प्रकरणातील मालमत्ता मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे यांच्या संयुक्त नावाने असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे यांना इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे यांना कोणीही वारस नसल्याबाबतचा अर्जदार क्र. १ ते ३ यांचा पुरावा विना आव्हानित असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. वरील विवेचनावरून अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरून अर्जदार क्र. १ ते ३ हे वारसाचा दाखला मिळविण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार क्र. १ **विशाल रमेश म्हात्रे**, अर्जदार क्र. २ **सचिन रमेश म्हात्रे** व अर्जदार क्र. ३ **समिक्षा रमेश म्हात्रे** हे **मयत सिमा रमेश म्हात्रे व मयत रमेश शंकर म्हात्रे** यांचे परिच्छेद क्र.६ मध्ये नमुद मिळकतीमध्ये त्यांच्या हिश्शाचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र मिळकतीच्या मुल्यांकनावर योग्य ती |

| | |
|---|---|
| | कायदेशीर कोर्ट फी आकारून अर्जदार यांना देण्यात यावे. |
| ३ | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून ते उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही. |
| ४ | नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फीचा तपशिल द्यावा. |
| ५ | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधीन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्ती पासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पूर्तता करावी. |

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.15 16:54:19 +0530

**दि. १५/०४/२०२६** **(आर.वाय.खंडारे)**

**पनवेल.** **पाचवे सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर पनवेल.**